# मंगलाबाई भागवत फाऊंडेशन

इतिहास व राज्यशास्त्र

वेळ : २ तास　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　एकूण गुण : 40

---

**सूचना -** i) सर्व कृती / प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

ii) उजवीकडे अंक प्रश्नांचे/कृतीचे पूर्ण गुण दर्शवतात.

iii) प्रश्न क्रमांक 1 ते 5 प्रश्न/कृती इतिहास व प्रश्न क्रमांक 6 ते 9 प्रश्न राज्यशास्त्र या विषयावरील आहेत.

iv) प्रश्न क्रमांक 1 (अ) मध्ये संपूर्ण विधान लिहिणे आवश्यक आहे.

v) प्रश्न क्रमांक 2(अ) आणि 8 (ब) मधील दिलेली संकल्पनाचित्रे त्याच नमुना आराखड्यानुसार पेनाने उत्तर पत्रिकेत तयार करणे अपेक्षित आहे.

## इतिहास

**प्र. 1) अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.** **(३)**

1. “प्रिमिटिव्ह कम्युनिझम टु स्लेव्हरी” हे पुस्तक ............. इतिहास लेखनाचे उदाहरण आहे.

i) राष्ट्रवादी　ii) वसाहतवादी　iii)प्राच्यवादी　iv) मार्क्सवादी

2. महाबळेश्वर जवळील भिलार हे ............ गाव म्हणून प्रसिद्ध आहे.

i) पुस्तकांचे　ii) वनस्पतींचे　iii) आंब्याचे　iv) किल्ल्यांचे

3. भारतातील पहिले इंग्रजी वर्तमानपत्र ............ यांनी सुरु केले.

i) जेम्स ऑगस्टस हिकी　ii) सर जॉन मार्शल　iii) ॲलन ह्यूम　iv) राजा राममोहन रॉय

**ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व लिहा.** **(३)**

| क्र. | “अ” गट | “ब” गट |
|---|---|---|
| i) | छाऊ नृत्य | पश्चिम बंगाल, झारखंड व ओडिशा येथील नृत्य |
| ii) | मुडियेट्टू | तमिळनाडूतील नृत्यनाट्य |
| iii) | बौद्ध मंत्रपठण | लडाख, जम्मू आणि काश्मीर |
| iv) | संकीर्तन | मणिपूर |

| क्र. | इतिहासकार | काय |
|---|---|---|
| i) | मायकेल  फुको | आर्केऑलॉजी ऑफ नॉलेज |
| ii) | रेने देकार्त | डिस्कोर्स ऑन द मेथड |
| iii) | कार्ल मार्क्स | दास कॅपिटल |
| iv) | जॉर्ज विल्हेम फ्रेडरिक हेगेल | द सिक्रेट ऑफ वर्ल्ड हिस्टरी |

| क्र. | खेळाडू | खेळ |
|---|---|---|
| i) | खाशाबा जाधव | कुस्तीगीर |
| ii) | सचिन तेंडुलकर | क्रिकेटपटू |
| iii) | मेजर ध्यानचंद | हॉकी खेळाडू |
| iv) | फोगट भगिनी | मुष्टियोद्धा |

**प्र. 2) अ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा. (कोणतीही दोन)** **(४)**

1)

| **सांस्कृतिक वारसास्थळ** | **ठिकाणे** |
|---|---|
| लाल किल्ला | ....................... |
| जंतर मंतर | ....................... |
| ....................... | बोधगया |
| कॅपिटल कॉम्पलेक्स | ....................... |

2) **कलारेषा पूर्ण करा.**




3)

| **लेखक** | **पुस्तके** |
|---|---|
| ....................... | द हिस्टरी ऑफ ब्रिटिश इंडिया |
| महात्मा फुले | ....................... |
| ....................... | स्त्री-पुरुष तुलना |
| ....................... | द हाय कास्ट हिंदू वुमन |

**ब) टिपा लिहा. (कोणत्याही दोन)** **(४)**

1. उपयोजित इतिहास
2. खेळणी आणि उत्सव
3. मार्को पोलो

**प्र. 3) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतीही दोन)** **(४)**

1. प्रादेशिक इतिहास लेखनाला चालना मिळाली.
2. अनेक विषयांच्या संशोधनामध्ये इतिहासाची संशोधन पद्धती उपयुक्त ठरते.
3. समाजाची प्रज्ञा आणि प्रतिभा यांचा प्रातिनिधिक आविष्कार कोश रचनेत बघायला मिळतो.
4. फुंको यांच्या लेखन पद्धतीला ज्ञानाचे पुरातत्व म्हटले आहे.

**प्र. 4) दिलेल्या उताऱ्याचे वाचन करुन त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. (4)**

आकाशवाणी : स्वातंत्रपूर्व कालखंडात १९२४ मध्ये “इंडियन ब्रॉडकास्टिंग कंपनी” (आयबीसी) या नावाने दर दिवशी कार्यक्रमांचे प्रसारण करणार एक खासगी रेडिओ केंद्र सुरु झाले. नंतर ब्रिटिश सरकारने याच कंपनीचे “इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसेस”(आयएसबीसी) असे नामकरण केले. ८ जून १९३६ रोजी या कंपनीचे नामकरण “ऑल इंडिया रेडिओ”(एआयआर) असे झाले.

भारत स्वतंत्र झाल्यावर AIR भारत सरकारच्या माहिती व प्रसारण खात्याचा एक भाग झाले. शासकीय कार्यक्रम व उपक्रमांची माहिती देणारे अधिकृत केंद्र असे याचे सुरुवातीला स्वरुप होते. ख्यातनाम कवी पंडित नरेंद्र शर्मा यांच्या सूचनेनुसार “आकाशवाणी”हे नाव दिले गेले. आकाशवाणीतर्फे विविध मनोरंजनपर, प्रबोधनपर व साहित्यिक मूल्य असणारे कार्यक्रम सादर केले जातात. त्याचप्रमाणे शेतकरी, कामगार, युवक आणि स्त्रिया यांच्यासाठी विशेष कार्यक्रम प्रसारित केले जातात. “विविधभारती” या लोकप्रिय रेडिओ सेवेद्वारे २४ भाषा आणि १४६ बोलीभाषांमध्ये कार्यक्रम सुरु झाले. अलिकडच्या काळात खासगी रेडिओ सेवा सुरु झाल्या आहेत. उदा. रेडिओ मिर्ची.

1. IBC चे नमाकरण काय झाले ? **(1)**
2. आकाशवाणी हे नाव कसे पडले ? **(1)**
3. रेडिओ सेवेच्या प्रगतीचे टप्पे लिहा. **(2)**

**प्र. 5) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (6)**

1. अभिलेखागारच्या व्यवस्थापनात कोणती कामे महत्वाची आहेत ?
2. पर्यटनाचे कोणतेही तीन प्रकार स्पष्ट करा.
3. स्त्रीवादी इतिहास लेखन म्हणजे काय ?
4. खेळांतून व्यावसायिक संधी कशा प्राप्त होतात ?

## राज्यशास्त्र

**प्र. 6) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा. (2)**

१. भारतात संविधानानुसार राज्य कारभार करण्यास .......... पासून सुरुवात झाली.

i) २६ जानेवारी १९४९ ii) २६ नोव्हेंबर १९४९

iii) २६ जानेवारी १९५० iv) १५ ऑगस्ट १९४७

२. भारतीय संविधानाच्या कलम ............ नुसार निवडणूक आयोगाची निर्मिती झाली आहे.

i) ३२३ ii) ३२४ iii)३२५ iv) ३२६

**प्र. 7) पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा. (कोणतेही दोन) (4)**

1. एखाद्या घटक राज्यात केव्हा व किती टप्प्यात निवडणुका घ्यायच्या हे राज्य सरकार ठरवते.
2. चळवळीला खंबीर नेतृत्वाची गरज नसते.
3. माहितीच्या अधिकारामुळे शासनाच्या कारभारात गोपनीयता वाढली आहे.

**प्र. 8)अ पुढील संकल्पना स्पष्ट करा. (कोणतीही एक)** **(2)**

1. राष्ट्रीय पक्ष
2. अल्पसंध्याकविषयक तरतुदी

**ब दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणतीही एक)** **(2)**

1.




2.




★★★★★★★★★★★